**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार, दिनांक २८ एप्रिल २०२४**

**ठळक बातम्या**

1. **महाराष्ट्रात दुसऱ्या टप्प्यात ८ मतदारसंघ मिळून सरासरी ६२.७१ टक्के मतदान.**
2. **राज्यातील लोकसभा निवडणूकीच्या तिसऱ्या टप्प्यातील प्रचार सभांचा वेग वाढला - मतदान ७ मे रोजी होणार.**
3. **अमरावतीत गुप्त मतदान प्रक्रियेचं जाहीर प्रदर्शन करणाऱ्या मतदारांवर होणार कारवाई.**

**आणि**

4. **आज आणि उद्या संपूर्ण विदर्भात पावसाचा येलो अलर्ट जारी.**

*****

**मतदान आकडेवारी दुसरा टप्पा**

लोकसभा निवडणुकांच्या दुसऱ्या टप्प्यात, भारतात सरासरी सत्तर टक्के मतदान झालं. सर्वाधिक मतदान, मणिपूर राज्यात, ८१.९० टक्के इतकं तर सर्वांत कमी, उत्तर प्रदेश राज्यात ५५.१९ टक्के इतकं झालं आहे. मात्र मणीपूरमधील आऊटर मणीपूर लोकसभा मतदारसंघातल्या, सहा मतदारसंघात पुन्हा मतदान घेण्याचा आदेश, निवडणूक आयोगानं दिला आहे.आयोगानं ३० एप्रिल रोजी सकाळी सात ते संध्याकाळी चार या वेळात, मतदान घ्यायला सांगितलं असून, उखरुल जिल्ह्यातल्या, पाच आणि सेनापती जिल्ह्यात, एका मतदारसंघात, २६ एप्रिलला झालेलं मतदान, आयोगानं रददबातल ठरवलं आहे. भारतीय निवडणूक

आयोगाच्या अँपवर, जारी ताज्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रात आठ मतदार संघ मिळून, सरासरी मतदान, ६२.७१ टक्के झालं आहे. यात सर्वाधिक मतदान, वर्धा मतदार संघात झालं असून, हि टक्केवारी ६४.८५ इतकी आहे. तर नांदेड मतदारसंघात, सर्वांत कमी म्हणजे, ६०.४९ टक्के इतकं मतदान झालं आहे. अनेक मतदार संघांत, पुरुषांपेक्षा महिलांचं मतदान करण्याचं प्रमाण कमी आढळून आलं. पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रात सरासरी ६३.७१ टक्के मतदान झालं होतं.

**तिसरा टप्पा प्रचार सभा**

राज्यातील लोकसभा निवडणूकीच्या, तिसऱ्या टप्प्यातील मतदान, सात मे २०२४ रोजी होणार आहे. तिसऱ्या टप्प्यात, रायगड, बारामती, उस्मानाबाद, लातूर, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, कोल्हापूर आणि हातकणंगले अशा, एकूण अकरा मतदार संघांचा समावेश असून, ३१७ उमेदवार रिंगणात आहेत. तिसऱ्या टप्प्यासाठी प्रचार सभांना वेग आला आहे. देवेंद्र फडणवीस यांनी आज बार्शी इथं, उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघाच्या, महायुतीच्या उमेदवार, अर्चना पाटील यांच्या प्रचारासाठी सभा घेतली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात, शेतकऱ्याला अडचणीत येऊ देणार नाही असा निर्धार असल्याचं सांगत मत देण्याचं आवाहन त्यांनी केलं. तर शरद पवारांनी, सोलापूर दौऱ्यात माळशिरस आणि पंढपुरात सभा घेतली. शरद पवारांनी, आपल्या सभेतून, मोदींवर टीका करत मोदींकडून जातीय तेढ निर्माण करणारी भाषणं, केली जात असल्याचा आरोप, त्यांनी पंढपुरातील सभेतून केला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देखील, सोलापूर दौऱ्यावर असून, माढा लोकसभा मतदारसंघात, त्यांच्या सभा होत आहेत. सोलापुरात प्रणिती शिंदे आणि आमदार, राम सातपुते यांच्यात थेट लढत आहे. आमदार प्रणिती शिंदेनी

प्रचारसभे दरम्यान, त्यांनी केंद्रातील, मोदी सरकारवर टीका करताना, पुलवामा हल्ल्याचा दाखला दिला. त्यावरून भाजपनं निवडणूक आयोगाकडे प्रणिती शिंदेंच्या विधानाची तक्रार केली आहे. दरम्यान, उद्या भाजपचे ज्येष्ठ नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सोलापूर इथं सभा होत असून, भाजपच्या कार्यकर्त्यांनी, त्यासाठी जय्यत तयारी केली आहे.

**एस. चोक्कलिंगम/ नियुक्ती**

आगामी लोकसभा निवडणुका मुक्त, निर्भय आणि पारदर्शक वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीनं, सर्व घटकांनी समन्वयानं काम करावं, असे निर्देश, राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम यांनी दिले. एस. चोक्कलिंगम यांनी आज दुपारी, सिंधुदूर्ग जिल्हाधिकारी कार्यालयात, निवडणूक विषयक आढावा बैठक घेतली त्यावेळी ते बोलत होते. दरम्यान, मुंबई उत्तर-मध्य लोकसभा मतदार संघासाठी, खर्चविषयक केंद्रीय निवडणूक निरीक्षक म्हणून, भारतीय राजस्व सेवेचे अधिकारी, सुरजकुमार गुप्ता यांची नियुक्ती, भारत निवडणूक आयोगानं केली आहे.

**चौथा टप्पा प्रचार सभा**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या, चौथ्या टप्प्यातील मतदान, तेरा मे २०२४ रोजी होणार असून, यात राज्यातील नंदुरबार, जळगाव, रावेर, जालना, औरंगाबाद, मावळ, पुणे, शिरूर, अहमदनगर, शिर्डी आणि बीड या, अकरा लोकसभा मतदार संघांचा समावेश आहे. या मतदार संघांत प्रचार सभांना सुरुवात झाली असून, धुळे जिल्ह्यात, निजामपूर इथं आज, इंडिया आघाडीचे उमेदवार, अनंत गीते यांची प्रचार सभा झाली.

नरेंद्र मोदी यांच्यामुळं, देश हुकूमशाहीकडे वळत असल्याचा आरोप, गीते यांनी यावेळी केला. आदिवासी बांधवांच्या, खनिज संपन्न जागा, बळजबरीनं ताब्यात घेऊन, त्या उद्योजकांना देऊन, आदिवासींना हद्दपार करण्याचा, भाजपचा कट आहे असं, ते म्हणाले. मतदार आपल्याला विजयी करतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. तसंच या क्षेत्रांमध्ये, मतदान वाढविण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत. बीड जिल्हा निवडणूक प्रशासनानं, आज मतदान जागृतीसाठी, अंबाजोगाई, परळी आणि, माजलगावसह विविध ठिकाणी सायकल रॅलीचं आयोजन केलं. निवडणूक शांततेत पार पाडावी आणि सर्वांनी आपला मताधिकार बजावावा असं आवाहन, या रॅलीतून करण्यात आलं.

**पियुष गोयल/संजय राऊत पत्रकार परिषद**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं, विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी, उत्तर मुंबईला, उत्तम मुंबई बनवण्याचा आपला निर्धार असल्याचं, भाजप नेते पियुष गोयल यांनी म्हटलं आहे. ते आज, मुंबईत बातमीदारांशी बोलत होते. उत्तर मुंबईला, आधुनिक तंत्रज्ञांवर आधारित वाहतूक व्यवस्था प्रदान करणं, आणि उत्तर मुंबई प्रदूषणमुक्त करणं, याला प्राधान्य दिलं जाईल, असं त्यांनी सांगितलं. तर आघाडी सरकारमध्ये, आम्ही कोणालाही पंतप्रधान बनवू पण, देश हुकूमशाहीच्या वाटेवर जाऊ देणार नाही असं वक्तव्य, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी केलं. आज सकाळी पुणे इथं माध्यमांशी बोलताना, त्यांनी विद्यमान सरकारवर टीका केली. बारामती लोकसभा मतदारसंघाची निवडणूक ही महाराष्ट्राच्या अस्मितेचा प्रश्न आहे, असं ते म्हणाले.

**‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’**

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमात, आजच्या भागात आपण, लातूर आणि बीड लोकसभा मतदार संघाचा, आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत, आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर, आणि, समाज माध्यमांवर हा कार्यक्रम आपणास ऐकता येईल.

**अमरावती मतदान प्रकियेचे उल्लंघन**

अमरावती लोकसभा मतदारसंघाच्या, निवडणुकीसाठी, शुक्रवारी मतदान घेण्यात आलं. दरम्यान, काही उत्साही मतदारांनी, निवडणूक आयोगाचे नियम, धाब्यावर बसवून, या गुप्त मतदान प्रक्रियेचं, जाहीर प्रदर्शन केलं. निवडणूक विभागाच्या निर्देशानुसार, त्यासर्व संबंधीत मतदारांवर कारवाई प्रस्तावित असल्याचं, पोलीस आयुक्तालयातील, सायबर सेल अधिकारी, अनिकेत कासार यांनी सांगितलं. 'होय आम्ही त्यांनाच मत दिल' हे पुराव्यानिशी सांगण्यासाठी, अनेक उत्साही मतदारांनी, मतदान करतानाचे फोटो काढून, सोशल माध्यमांवर टाकले. शुक्रवारपासून अश्या अनेक पोस्ट, सोशल माध्यमांवर व्हायरल झाल्या होत्या. मतदारांकडून त्यांच्या मतदान करतानाचे फोटो काढले जात असताना, सदर मतदान केंद्रात हजर असलेले मतदान अधिकारी आणि, सुरक्षा अधिकारी यापैकी कुणाचंच त्याकडे लक्ष का गेलं नाही? असा, हा प्रश्नही, या निमित्तानं उपस्थित झाला आहे.

**गांजा विक्रेत्यास अटक**

भंडारा जिल्हयाच्या तुमसर शहरातील, गांधी सागर तलावाच्या पाळीजवळ, गांजा विक्री करण्याच्या, प्रयत्नात असलेल्या दोघांना, तुमसर पोलीसांनी ताब्यात घेतलं आहे. त्यांच्या जवळून ९३८ ग्राम गांजा, जप्त करण्यात आला आहे. तुमसर शहरात मागील काही दिवसांपासून, अवैध धंदे फोफावले असून, गांजा विक्रीला सुद्धा वेग आला आहे. अनेक तरुण, गांजा सेवनाच्या आहारी गेले आहेत. तुमसर शहरात लगतच्या प्रदेशातून, मोठ्या प्रमाणात गांजा तस्करी होत असल्याचं निरीक्षण असून, मात्र पोलीसांच्या या कारवाईमुळं, गांजा तस्करांचं आणि संबंधित व्यवसायिकांचं धाबं दणाणलं आहे.

**बसच्या वाढीव फेऱ्या**

मे महिना लग्नसराईचा असल्यानं, राज्य परिवहन महामंडळानं, बसफेऱ्यांची संख्या वाढवावी अशी मागणी, अकोला जिल्हयातील प्रवाशांनी केली आहे. महिला सन्मान योजनेअंतर्गत, एसटी बस भाड्यात, ५० टक्के सूट आणि ७५ वर्षांवरील प्रवाशांसाठी, शून्य तिकीट योजना सुरु असल्यानं, एसटीतून प्रवास करणाऱ्यांच्या संख्येतही वाढ झाली आहे. सध्या वाढत्या तापमानामुळं आणि प्रवाशांच्या गर्दीमुळं बसस्थानकावर, काही असुविधांचा सामना प्रवाशांना करावा लागत आहे. त्याची सोडवणूक करावी तसंच, ज्या ठिकाणी बस बंद किंवा, महामंडळाच्या गाड्या जात नाहीत अशा ठिकाणी, बस फेऱ्या वाढवाव्यात अशी मागणी, ग्रामस्थांसह प्रवाशांकडून केली जात आहे.

**टी-४ वाघीण**

गेल्या काही दिवसांपासून, गोंदियाच्या नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पातील, टी-४ ही वाघीण आणि तिच्या, चार बछड्यांनी, पर्यटकांना चांगलीच भुरळ घातली आहे. नवेगावबांध-नागझिरा व्याघ्र प्रकल्पातसुद्धा, ताडोबाप्रमाणेच, वाघासह इतर वन्यप्राण्यांचे दर्शन होत असल्यानं, इथं येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत, वाढ झाली आहे. गेल्या वर्षी, २० मे रोजी, या व्याघ्र प्रकल्पात, दोन वाघीणी सोडण्यात आल्या होत्या. त्यानंतर, १५ दिवसांपूर्वी, ताडोबा व्याघ्र प्रकल्पातील, एक वाघीण सोडण्यात आली. या व्याघ्र प्रकल्पात, वीसहून अधिक बिबट असून, ५ ते ७ वाघ आहेत. पर्यटकांना वाघाचं अधिक आकर्षण असून, दूरवरून पर्यटक, नवेगावबांध- नागझिरा व्याघ्र प्रकल्पात, सफारीसाठी येत असल्याचं, आमच्या प्रतिनिधीनं कळविल आहे.

**हवामान**

प्रादेशिक हवामान विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, आज विदर्भाच्या सर्व जिल्ह्यात, पावसाचा यलो अलर्ट, जारी करण्यात आला असून, सर्वत्र ढगाळ वातावरणासह, सोसाटयाच्या वाऱ्याची शक्यता, वर्तवण्यात आली आहे. तसंच उद्यासुद्धा, अकोला आणि बुलढाणा हे दोन जिल्ह्ये वगळता, विदर्भाच्या इतर सर्व जिल्ह्यात पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. मागील चोवीस तासांत, विदर्भात कमाल तापमान, चंद्रपूर इथं, ४३.६ अंश सेल्सियस तर, किमान तापमान, यवतमाळ इथं बावीस अंश सेल्सियस एवढं नोंदवण्यात आलं. नागपुरात, कमाल तापमान ३७ अंश सेल्सियस तर किमान तापमान, २३.२ अंश सेल्सियस एवढ, नोंदवण्यात आलं. दरम्यान, या

आठवड्यात, कमाल तापमान ३८ ते ४१ अंश सेल्सिअस, राहण्याची शक्यता आहे.

**बांगलादेशसाठी शिष्टमंडळ रवाना**

राष्ट्रीय सुशासन केंद्र आणि बांगलादेशचे, सार्वजनिक प्रशासन मंत्रालय, यांच्यामधील सामंजस्य कराराच्या, नूतनी करणाबाबत, चर्चा करण्यासाठी प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रार निवारण विभागाचे, शिष्टमंडळ बांगलादेश भेटीवर जात आहे. या विभागाचे सचिव, व्ही.श्रीनिवास बांग्लादेशला 28 ते 30 एप्रिल दरम्यान, भेट देणाऱ्या चार सदस्यांच्या, शिष्टमंडळाचे नेतृत्व करतील. या भेटीदरम्यान, भारताचे राष्ट्रीय सुशासन केंद्र आणि, बांगलादेशचे सार्वजनिक प्रशासन मंत्रालय, यांच्यामधील सामंजस्य कराराचे, 2024 ते 2029 या कालावधीसाठी नूतनीकरण करण्याबाबत, चर्चा करण्यात येणार आहे. बांगलादेशच्या सार्वजनिक प्रशासन मंत्रालयाच्या निमंत्रणावरून, ही भेट आयोजित करण्यात आली असून, या भेटीदरम्यान, बांगलादेशच्या सनदी सेवकांसाठी, कारकीर्दी दरम्यान क्षमता उभारणी कार्यक्रमांवर भर देण्यात येईल.

*****